# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.देवेंद्र दिगांबर नसकरी, वय ५२ वर्ष, पद— सहायक पोलीस उपनिरिक्षक ब.न.५५०, (वर्ग—३) नेमणूक — पोलीस स्टेशन मंगरुळ दस्तगीर ता.धामणगाव रेल्वे जि.अमरावती अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १६.०३.२०२० चे ते वा. १४.०५ दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | २०००/— रुपये |
| ५ | पडताळणी दरम्यान तडजोडी अंती मागणी केलेली लाच रक्कम | ४००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४००/— रुपये |
| ७ | घटनास्थळ | पो.स्टे.मंगरुळ दस्तगीर चे गेट समोर ता.धामणगाव रेल्वे जि. अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे शेती करीत असून मे २०१९ मध्ये तक्रारदार व त्यांची बहिण यांचेमध्ये शेतीच्या कारणावरुन वाद झाला होता. त्या वादावरुन पोलीस स्टेशन मंगरुळ दस्तगीर येथे तक्रारदार त्यांची पत्नी व मुली यांचे विरुध्द कलम ३२६, १८८, ३४ भादवी गुन्हा दाखल झाला. सदर गुन्हयांचा तपास पोलीस स्टेशन मंगरुळ दस्तगीर चे सपोउपनि श्री.देवेंद्र नसकरी यांचेकडे होता. सदर गुन्हयांची चार्जशीट न्यायालयात लवकर दाखल करण्यासाठी श्री.नसकरी यांनी तक्रारदार यांना २०००/— रुपयाची लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने दिनांक ०५/०३/२०२० व दिनांक १६/०३/२०२० रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान यातील आलोसे यांनी गुन्हयातील चार्जशीट लवकर दाखल करण्यासाठी पंचासमक्ष ४००/— रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले वरुन आज दिनांक १६/०३/२०२० रोजी सापळा कार्यवाही दरम्यान ४००/— रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक डॉ.अनुप एस.वाकडे, नापोकॉ.युवराज राठोड, पोकॉ.आशिष जांभोळे, पोकॉ.वैभव जायले तसेच चालक ए.एस.आय. श्री.सतीश किटूकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

**संपर्क :— अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क. — १०६४, दुरध्वनी कमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.**

(डॉ.अनुप एस.वाकडे)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned by CamScanner